ePaper

## कुणाला घाबरून नाही, तर समाज स्वास्थ्यासाठी शब्द मागे घेतो; मनोज जरांगे




| वर्ष - 7 । अंक - 200 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™


लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । मंगळवार, दिनांक 28 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


### आतील पानांत


- हार्दिक पांड्या मुंबईच्या ताफ्यात!
- 'अक्षरा'ची राजकारणात एंट्री?
- राहुलच्या अडचणीत वाढ होणार?
- मी माझा शब्द मागे घेतो : जरांगे


# नाशिक फाटा 'रॅम्प'ला मुहूर्त!




### » वाहनचालकांना दिलासा मिळणार :
### » महापालिकेने पुढील कार्यवाहीसाठी नागरिकांकडे मागविल्या सूचना

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**कासारवाडी येथील नाशिक फाटा चौकातील लूप (रॅम्प) तब्बल दहा वर्षांनंतर वाहतुकीसाठी खुला करण्यात येत आहे. त्यासाठी महापालिकेने नागरिकांकडून सूचना मागविल्या आहेत. आलेल्या सूचनेचा विचार करून महापालिकेकडून पुढील कार्यवाही केली जाणार आहे.**

जागतिक बँकेचे कर्ज घेऊन महापालिकेने चौकात उद्योजक जेआरडी टाटा दुमजली उड्डाणपूल बांधला आहे. लुपसाठी सुमारे 10 कोटींचा खर्च झाला आहे. वाहने थेट चौकात उतरणार असल्याने अपघात होण्याचा धोका असल्याने वाहतूक पोलिसांनी हा लूप वाहतुकीस खुला करण्यास परवानगी दिली नाही. गेली 10 वर्षे हा लूप बंद स्थितीत आहे. तर, लूप चुकीचा पद्धतीने बांधल्याने तो खुला केला जात नसल्याचा विरोधकांनी आरोप केला आहे. तर, महामेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर लूप सुरू करण्याची ग्वाही महापालिका आयुक्तांनी दिली होती.

### चौक सिग्नल फ्री नाहीच!

*» सध्या येथील दुभाजक बंद केला जाणार नसल्याने हा चौक सिग्नल फ्री होणार नसल्याने वाहनचालकांतून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. कासारवाडीहून पिंपरीच्या दिशेने उतरण्यासाठी रॅम्प आणि पिंपळे गुरव-भोसरी पुलावरून चौकात उतरण्यासाठी लूप बांधला आहे. मेट्रोचे काम पूर्ण झाल्याने लूप वाहतुकीस खुला केला जाणार आहे. त्यामुळे पुलावरून खाली चौकात येऊन पुण्याच्या दिशेने जाणार्या वाहन चालकांची सोय होणार आहे.*

# पुणे-अहमदनगर द्रुतगती मार्गावर ज्वलनशील-विषारी वायू वाहून नेणारा टँकर उलटला

### » द्रुतगती मार्गावरील वाहतूक वळवली; टँकर रिलायन्स पेट्रोकेमिकल कंपनीचा

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महाराष्ट्रातील पुणे-अहमदनगर द्रुतगती मार्गावर अत्यंत ज्वलनशील आणि विषारी वायू वाहून नेणारा टँकर उलटल्याने आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. टँकर चालवणाऱ्या चालकाला गॅसच्या प्रभावाखाली आल्यानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चालकाला श्वास घेण्यास त्रास होत होता. दुसरीकडे, उलटलेल्या गॅस टँकरला आग लागू नये यासाठी अग्निशमन दलाचे प्रयत्न सुरू आहेत. पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून द्रुतगती मार्गावरील वाहतूक वळवली. हा टँकर रिलायन्स पेट्रोकेमिकल कंपनीचा असल्याचे सांगण्यात येत आहे. जिथे टँकर उलटला. त्या रस्त्यावरील वाहतूक खूप जास्त आहे. अशा स्थितीत टँकर हटेपर्यंत मार्ग वळवण्यात आला आहे.

### रात्री उशिरा अपघात झाला

पुणे-अहमदनगर महामार्गावरील वडगाव शेरी चौकाजवळ गॅस वाहतूक करणारा टँकर उलटल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पुणे अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी




सांगितले की, त्यांना एका खाजगी क्षेत्रातील केमिकल कंपनीद्वारे संचालित इथिलीन ऑक्साईड वाहून नेणारा टँकर 12.47 च्या सुमारास पलटी झाल्याची माहिती मिळाली. टँकरमध्ये भरलेले इथिलीन ऑक्साईड हे अत्यंत ज्वलनशील, विषारी आणि कार्सिनोजेनिक रसायन आहे. त्यामुळे टँकरच्या आजूबाजूच्या परिसरात बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. पुण्यात अग्निशमन दल आणि पोलिसांच्या पथकांनी अचानक उद्भवलेली आपत्कालीन परिस्थिती हाताळली.

# कचरा जाळणाऱ्यांकडे पालिकेचे दुर्लक्ष!

## » प्रदूषणाची पातळी वाढल्याने हवेची गुणवत्ता ढासळली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील प्रदूषणाची पातळी वाढल्याने आणि हवेची गुणवत्ता ढासळली असतानाही सार्वजनिक ठिकाणी कचरा जाळणाऱ्यांकडे महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा जाळून प्रदूषण करणाऱ्यांविरोधात गेल्या पंचवीस दिवसांत ८० नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. कचरा जाळण्याचे प्रमाण वाढत असताना कारवाई मात्र संथ गतीने सुरू असल्याचे चित्र आहे.**



शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक जागेत उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर थेट कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला होता. त्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई केली जाते. मात्र, यापुढे नोटीस किंवा समज देण्याची कारवाई होणार नसून, थेट दंडात्मक कारवाई केली जात आहे. मात्र, त्याचा वेग संथ असल्याचे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. शहरात नदीपात्र, विविध घाट, पूल, नाले, राष्ट्रीय महामार्ग, कालव्यामध्ये कचरा टाकण्याचे आणि जाळण्याचे प्रमाण मोठे आहे. मध्यवर्ती भागासह उपनगरांमध्ये सर्रास सुका कचरा जाळला जात आहे.

मात्र, पंधरा क्षेत्रीय कार्यालयांकडून संथ गतीने कारवाई केली जात आहे. गेल्या पंचवीस दिवसांत केवळ ८० जणांवर कारवाई करून ५० हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या २ हजार ९७५ नागरिकांवर कारवाई करण्यात आली असून, आठ लाख ८३ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम म्हणाले, की सध्या कारवाई सुरू आहे. कारवाईचा वेग वाढविण्याची सूचना क्षेत्रीय कार्यालय आणि विशेष पथकाला करण्यात आली आहे.

शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक जागेत उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर थेट कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला होता. त्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई केली जाते. मात्र, यापुढे नोटीस किंवा समज देण्याची कारवाई होणार नसून, थेट दंडात्मक कारवाई केली जात आहे. मात्र, त्याचा वेग संथ असल्याचे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

### उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई


» शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक जागेत उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर थेट कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला होता. त्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. मात्र, त्याचा वेग संथ असल्याचे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. शहरात नदीपात्र, विविध घाट, पूल, नाले, राष्ट्रीय महामार्ग, कालव्यामध्ये कचरा टाकण्याचे आणि जाळण्याचे प्रमाण मोठे आहे. मध्यवर्ती भागासह उपनगरांमध्ये सर्रास सुका कचरा जाळला जात आहे.

# पेंडींच्या निर्यातीत ३० टक्क्यांनी वाढ!

## » सोयाबीन, मोहरीच्या खाद्याला मागणी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उच्चांकी तेल आयातीमुळे आर्थिक अडचणीत आलेल्या देशी खाद्यतेल उद्योगाला पेंडींच्या निर्यातीमुळे दिलासा मिळाला आहे. एप्रिल – ऑक्टोबर या काळात मागील वर्षीच्या तुलनेत पेंडींच्या निर्यातीत ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. बिगर जणुकीय सुधारित सोयाबीन आणि मोहरीच्या पेंडीला आग्नेय आशियासह अमेरिका आणि युरोपातून मागणी आहे.**



द सॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ इंडियाने दिलेल्या माहितीनुसार सोयाबीन, मोहरी, तीळ, शेंगदाणा तेल तयार करण्याच्या प्रक्रियेत तेल काढल्यानंतर शिल्लक राहणारी आणि पोल्ट्री खाद्य आणि पशूखाद्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पेंडीची एप्रिल-ऑक्टोबर या काळात देशातून २५,६६,०५१ टन निर्यात झाली आहे. मागील वर्षी याच काळात १९,७५,४९६ लाख टन पेंडींची निर्यात झाली होती. यंदा ५, ९०,५५५ लाख टन निर्यात जास्त झाली आहे. फक्त ऑक्टोबर महिन्याचा विचार करता, यंदाच्या ऑक्टोबर महिन्यात २,८९,९३१ टन निर्यात झाली होती. मागील वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये २,१३,१५३ टन निर्यात झाली होती.बिगर जणुकीय सुधारित सोयाबीन आणि मोहरीच्या पेंडीला आग्नेय आशिया, अमेरिका आणि युरोपातून मोठी मागणी आहे. या पेंडीचा वापर पशूखाद्य आणि पोल्ट्री खाद्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. भारत बिगर जणुकीय सुधारित तेलबियांच्या पेंडीचा जगातील सर्वात मोठा उत्पादक आहे. सोयाबीन पेंडींची निर्यात ५७० डॉलर प्रति टन दराने होत होती. त्यात वाढ होऊन मागील महिन्यात ६०६ डॉलर प्रति टन दराने निर्यात होत आहे. मागील वर्षी मोहरीच्या पेंडीची २२, ९६, ९४३ टन इतकी आजवरची उच्चांकी निर्यात झाली होती. यंदाही मोहरीच्या पेंडीची वेगाने निर्यात सुरू आहे. एप्रिल – ऑक्टोबर महिन्यांत १५,१३,९१७ टन निर्यात झाली आहे. मोहरीच्या पेंडीची ३२५ ते ३३५ डॉलर प्रति टन दराने प्रामुख्याने दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, थायलंड आदी देशात निर्यात सुरू आहे. देशातून दरवर्षी पाच-सहा लाख टन भाताच्या पेंडीची (राईस ब्रान मील) निर्यात होते. ही निर्यात प्रामुख्याने व्हिएतनाम, बांगलादेश, थायलंडला होत होती. पण देशांतर्गत पशूखाद्य आणि पोल्ट्री खाद्याच्या दरात वाढ झाल्यानंतर केंद्र सरकारने ३० नोव्हेंबरपर्यंत भाताच्या पेंडीच्या निर्यातीवर निर्बंध लागू केले आहेत.

# २२ धरणांत अवकाळी पावसाची जोरदार हजेरी!

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

जिल्ह्यातील २२ धरणांच्या पाणलोट क्षेत्रात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. दिवाळीतही अशाच प्रकारे धरणांच्या परिसरात पाऊस पडला होता. शहरासह जिल्ह्यात पाऊस होण्याची शक्यता पुणे वेधशाळेने व्यक्त केली होती. त्यानुसार रविवारी सायंकाळच्या सुमारास पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यात २६ धरण प्रकल्प आहेत, त्यापैकी २२ धरणांच्या परिसरात पाऊस पडला. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर धरणक्षेत्रात २५ मिलिमीटर, वरसगाव आठ, पानशेत दहा, तर खडकवासला धरण परिसरात १३ मि. मी. पावसाची नोंद झाली. पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पवना धरणक्षेत्रात २५ मि.मी. पाऊस पडला. याशिवाय जिल्ह्यातील अन्य धरणांपैकी पिंपळगाव जोगे, माणिकडोह, येडगाव, वडज, डिंभे, घोड, चिलेवाडी, चासकमान, भामा आसखेड, कळमोडी, वडीवळे, आंद्रा, कासारसाई, मुळशी, गुंजवणी आणि भाटघर या धरणांच्या परिसरात पावसाने हजेरी लावल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. शहरासह जिल्ह्यात पाऊस होण्याची शक्यता पुणे वेधशाळेने व्यक्त केली होती.

त्यानुसार रविवारी सायंकाळच्या सुमारास पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यात २६ धरण प्रकल्प आहेत, त्यापैकी २२ धरणांच्या परिसरात पाऊस पडला. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर धरणक्षेत्रात २५ मिलिमीटर, वरसगाव आठ, पानशेत दहा, तर खडकवासला धरण परिसरात १३ मि. मी. पावसाची नोंद झाली.

# मावळात खा. संजय राऊतांची तोफ धडाडणार!

## खा. श्रीरंग बारणेंपुढे ठाकरेंच्या शिवसेनेचे आव्हान

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना स्टाईल दणकेबाज भाषणांनी राज्याच्या राजकारणात उलथापालथ करणाऱ्या आणि विरोधकांना घायाळ करण्याची खासियत खा. संजय राऊत यांच्याकडे आहे. आता त्यांच्या तडाखेबाज भाषणांची तोफ पिंपरी-चिंचवडकरांना प्रत्यक्ष अनुभवयाला मिळणार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून त्यांच्यावर मावळ लोकसभांतर्गत येणाऱ्या पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभेची जबाबदारी दिली आहे. त्यामुळे विद्यमान खा. श्रीरंग बारणे यांच्यापुढे ते आव्हान उभे करतील असे सध्याचे तरी चित्र आहे.**



महाविकास आघाडीचा प्रयोग यशस्वी करण्यात खा. संजय राऊत यांची महत्वाची भूमिका आहे. अनेकांना अंगावर घेत त्यांनी राजकीय जुळवाजुळव केली. तेव्हापासून खा. राऊत यांची वक्तव्ये राज्याच्या राजकारणात विरोधक आणि मित्र पक्ष गंभीर घेत आहेत.

खा. राऊत यांनी केलेल्या भाकितांनी विरोधकांसह मित्र पक्षही घायाळ होत आहेत. गेल्या काही महिन्यांपुर्वी शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या फूटीपुर्वी खा. राऊत पिंपरी-चिंचवड शहरात आले होते. या वेळी त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचा आगामी महापौर शिवसेनेचा असेल असे भाकित करून आघाडीतील मित्र पक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गोटात अस्वस्थता निर्माण केली होती. केवळ नऊ नगरसेवक असताना महापौर कसा, याची राजकीय गणिते करण्यात अनेक राजकीय जाणकार व्यस्त राहिले होते. तर दुसरीकडे थेट अजित पवारांना दुखाविण्याची धमक राऊतांनी ठेवली होती. त्यामुळे एका बाजूला शिवसेनेत आलेली मरगळ दुर करण्यात ते यशस्वी झाल्याचेही चित्र होते.




सध्या लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आडाखे बांधायला सुरूवात केली आहे. लोकसभा निहाय सेनेने विभागीय नेत्यांची निवड केली आहे. यामध्ये खा. संजय राऊत यांच्यावर मावळ लोकसभांतर्गत येणाऱ्या पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभेची जबाबदारी दिली आहे. तर उर्वरीत पनवेल, कर्जत आणि उरण विधानसभेची जबाबदारी खा. अनंत गीते यांच्यावर सोपवली आहे. त्यामुळे शहरात खा. राऊत यांचे दौरे वाढणार असल्याचे चित्र आहे. राजकीय आखाड्यात ते खा. श्रीरंग बारणे यांच्यापुढे मोठे आव्हान उभे करतील अशा चर्चा आहेत. मात्र राजकीय स्थिती काय असेल हे येणाऱ्या निवडणूकीत स्पष्ट होईल.

### खा. बारणे विरुद्ध खा. राऊत सामना रंगणार

गतवेळच्या लोकसभेत खा. श्रीरंग बारणे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यामध्ये जोरदार सामना रंगला होता. दोघांच्या समर्थकांनी ऐकमेकांवर भाषणातून आणि सोशल वॉर सुरु केले. यामध्ये खा. श्रीरंग बारणे वरचढ ठरल्याचे चित्र होते. पार्थ पवार यांचे भाषणावर प्रभूत्व नसल्याचा नकारात्मक संदेश मतदारसंघात पसरला. सध्याची परिस्थिती उलटी आहे. या वेळी खा. बारणे यांना खा. संजय राऊत यांचा सामना करावा लागणार आहे. राऊंतांनी सोडलेला आरोपांचा बाण खा. बारणे कसा पेलणार ? त्याला प्रत्युत्तर कसे देणार ? हे पाहणे मतदारांसाठी रंगतदार असणार आहे.

### शिवसेनेतील मरगळ हटणार

पिंपरी-चिंचवड शहरात शिवसेनेला मानणारा मोठा वर्ग आहे. मात्र सध्या हा वर्ग दोन गटात विखुरला आहे. सत्ताधारी गटात सहभागी झाल्याने खा. बारणे यांच्या गटात उत्साह आहे. मात्र उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला बळ देणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे. आता खा. संजय राऊत यांच्यावर जबाबदारी दिल्याने ठाकरेंच्या शिवसेनेतील मरगळ हटवून पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये ते उत्साह भरतील अशी चर्चा रंगत आहे. तसेच जुन्या आणि नव्या पदाधिकाऱ्यांसह मित्र पक्षातील पदाधिकाऱ्यांना सोबत घेण्याचे राजकीय चाल देखील ते खेळतील, अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये आहे.

---

# संविधानामुळे भारताची लोकशाही टिकली : कुंदा भिसे

## उन्नती सोशल फाऊंडेशनच्या वतीने संविधान दिन साजरा

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारताची लोकशाही ही संविधानामुळे टिकून आहे. संविधानाचे रक्षण करणे नागरिक म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य आहे. संविधानामुळेच सामान्य नागरिकांना हक्क, महिलांना शिक्षण, नोकरीमध्ये संधी उपलब्ध झाली, असे प्रतिपादन उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा कुंदा संजय भिसे यांनी व्यक्त केले.**



संविधान दिनानिमित्त पिंपळे सौदागर येथे उन्नती सोशल फाऊंडेशनच्या वतीने संविधान दिवस गौरव यात्रा काढण्यात आली. यावेळी अध्यक्षा कुंदा भिसे बोलत होत्या. यावेळी उन्नती सोशल फाऊंडेशन संस्थापक संजय भिसे, मनोज ब्राह्मणकर, सागर बिरारी, राकेश वाणी, राजेंद्रनाथ जसवाल, उत्तम धनवटे, वालमीक काटे, विठाई वाचनालयाचे, आनंद हास्य क्लब व जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य आदी उपस्थित होते. कुंदा भिसे म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळेच लोकशाहीत प्रत्येकाला समान नागरी हक्क प्राप्त झाला आहे. त्यामुळे कोणी मोठा-कोणी छोटा असा भेद नाहिसा झाला. सामान्य नागरिकाला सुध्दा त्याचे मत मांडण्याचा अधिकार मिळला आहे. कायदा हा सर्वांसाठी सामान आहे. त्यामुळे भेदभाव, उच्च नीच हे अंतर नाहिसे झाले आहे.

---

## मोहननगर येथे दहशत निर्माण करणाऱ्या भाईला अटक

।पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

चिंचवड परिसरातील मोहननगर येथे रस्त्यावर कोयता घेऊन नागरिकांना धमकावणा-या स्वयंघोषित भाईला पिंपरी पोलिसांनी बेड्या ठोकल्या. ही कारवाई रविवारी (दि. 26) रात्री पावणे नऊ वाजताच्या सुमारास करण्यात आली. आशिष देविदास गोरखा (वय 26, रा. महात्मा फुलेनगर, चिंचवड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार गणेश करपे यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आशिष गोरखा हा रविवारी रात्री कोयता घेऊन मोहननगर येथे सार्वजनिक रस्त्यावर आला. तिथे असणाऱ्या व्यावसायिकांना व पादचारी नागरिकांना त्याने दमदाटी केली. 'जिलब्या गँगला जो कोणी नडणार, त्याची सुट्टी नाही' असे म्हणत शिवीगाळ करून धमकी देऊन त्याने परिसरात दहशत निर्माण केली.



भूमिका

**‘राहुल गांधींनी पंतप्रधानांचा ‘पनवती’ असा उल्लेख करणे हे सरंजामशाहीच्या परंपरेतील आणखी एक उदाहरण आहे. जातवार जनगणना आणि सामाजिक न्याय यांचा वापर राहुल गांधी निव्वळ घोषणा म्हणून करतात हे खरे. पण असल्या मागण्यांपासून आजचा भारत कधीच पुढे गेला आहे.. आदिवासी महिला राष्ट्रपती आणि अतिमागास समाजातून आलेले पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली हा देश उत्क्रांत झालेला आहे!**

# हा दोष राहुल गांधींच्या परंपरेचा!



काँग्रेसचे नेते आपल्या सरंजामी वृत्तीचे दर्शन घडवण्यासाठी निवडणूक प्रचारकाळाचा वापर कसा करतात आणि राजकीय संवादाची इयत्ताच त्यामुळे कशी खालावते, हे याआधीही दिसलेले आहेच. पण सध्या सुरू असलेल्या पाच महत्त्वाच्या राज्यांच्या निवडणूक प्रचारात या नेत्यांची विपर्यस्त आणि आक्षेपार्ह विधाने हा भारतीय राजकारणातील नवा नीचांक आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अलीकडे- म्हणजे विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर केलेले वक्तव्य हे तर आपल्या राजकीय व्यवस्थेतील अधिकाराच्या खोलवर बसलेल्या भावनेचे द्योतक आहे. फक्त एका कुटुंबालाच देशावर राज्य करण्याचा अधिकार आहे, असा राजकीय आस्थापनेतील एका वर्गाचा ठाम समज असल्याचे त्यातून दिसते. या समजामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आजवर सातत्याने संस्थात्मक द्वेष सहन करावा लागला आहे. ते धनाढ्य खानदानातून आलेले नाहीत, यावर अवमानकारक भाष्य करण्यापासून ते मल्लिकार्जुन खरगे यांनी त्यांच्या वडिलांवर केलेल्या अत्यंत घृणास्पद टिप्पणीपर्यंत- अशी कैक विधाने या वर्गाने केली. ही अशी विधाने मुळात अत्यंत अनावश्यक आणि आपल्या लोकशाहीचे आरोग्य बिघडवणारी आहेत. देशातील सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत पोहोचलेल्या पहिल्या आदिवासी महिला- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू- यांच्यावरही असेच शाब्दिक हल्ले करण्यात आलेले आहेत हे अनेकांना आठवत असेल. त्यांचा उल्लेख ‘सैतानी’ मानसिकतेची प्रतिनिधी म्हणून करण्यापासून ते लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदावरील व्यक्तीने केलेल्या ‘राष्ट्रपत्नी’ या घृणास्पद टिप्पणीपर्यंतचे अनेक हल्ले राष्ट्रपतीपदावरील व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर या उच्चभ्रू राजकीय आस्थापनेने केले, कारण ते एका आदिवासी महिलेला हे पद मिळण्याची कल्पनाच स्वीकारू शकत नव्हते. देशातील सर्वात मागास प्रदेशातून कुणी तरी थेट रायसीना हिल येथे पोहोचते आहे, हेच त्यांना खपत नव्हते. याच मानसिकतेची उदाहरणे इतिहासात तर किती तरी आहेत. उपेक्षित घटकांच्या हक्कांसाठी अग्रेसर असलेल्या नेत्यांपैकी बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर यांनाही अशाच प्रकारचा त्रास सहन करावा लागला. ज्येष्ठ पत्रकार संतोष सिंह यांनी या संदर्भात त्यांच्या ‘रुल्ड ऑर मिसरुल्ड’ या २०१५ सालच्या पुस्तकात नोंदवलेले निरीक्षण असे आहे की, कर्पुरी ठाकूर जेव्हा बिहारमध्ये मुख्यमंत्रीपदावर दुसऱ्यांदा विराजमान झाले (१९७७-७९) त्यानंतर त्यांच्याविरोधात, “कर्पुरी कर पूरा, छोड कुर्सी पकड उस्तुरा” अशी घोषणा काही लोक देऊ लागले होते! म्हणजे कर्पुरी ठाकूर हे नाभिक समाजातून आलेले असल्याने त्यांना मुख्यमंत्रीपदाची खुर्ची सोडून त्यांच्या पारंपरिक व्यवसायात परत जाण्यास सांगण्यापर्यंत या लोकांची मजल तेव्हाच गेली होती. याच वर्चस्ववादी, पुरातन आणि म्हणून खोलवर रुतलेल्या सामाजिक भावनांबद्दल राष्ट्राला इशारा देण्याचे काम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या स्वीकाराच्या पूर्वसंध्येला (२५ नोव्हेंबर १९४९) केले होते. त्या प्रसिद्ध भाषणात डॉ. आंबेडकर म्हणतात- “सामाजिक लोकशाहीचा पाया असल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? ती स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनाची तत्त्वे मानणारी जीवनपद्धती आहे.. या तिन्ही तत्त्वांची त्रयी एकत्रच स्वीकारावी लागेल, त्यांची फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा उद्देशच नष्ट करणे होय.अनैसर्गिकपणे त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी हवालदारांची आवश्यकता भासेल!”डॉ. आंबेडकर यांचे हे संविधान-सभेतील अखेरचे भाषण अनेकांनी, अनेकदा उद्धृत केले आहे खरे, पण ‘सामाजिक लोकशाही ही राजकीय लोकशाहीची पूर्वअट आहे’ – हे त्यांचे विधान आजही प्रासंगिक आहे. सामाजिक न्याय हा सार्वजनिक हिताचा विषय आहे- तो राजकारणाचा विषय नाही.

## संपादकीय »

# निवडक नियमन!

***कोणावरही कारवाई करताना ती कोणत्या कारणांसाठी केली जात आहे याची किमान माहिती देण्याची गरज सध्या चलती असलेल्या काही सरकारी यंत्रणांस अलीकडे वाटेनाशी झाली आहे.***

कोणावरही कारवाई करताना ती कोणत्या कारणांसाठी केली जात आहे याची किमान माहिती देण्याची गरज सध्या चलती असलेल्या काही सरकारी यंत्रणांस अलीकडे वाटेनाशी झाली आहे. बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून बँकेचा कारभार प्रशासकाहाती दिला त्यावरून असा संशय येण्यास जागा आहे. तीन महिन्यांपूर्वी, सप्टेंबरात झालेल्या या बँकेच्या लेखापरीक्षणात नियामकांस असे काही आक्षेपार्ह आढळले होते काय, त्याची माहिती संचालकांस देण्यात आली होती काय याबाबत सविस्तर तपशील अद्याप अधिकृतपणे उपलब्ध नाही. पण ‘अभ्युदय’ची अनुत्पादक कर्जे वाढली होती आणि त्यांचे प्रमाण १२ टक्क्यांच्या वर गेले होते, संचालकांनी त्यांच्या राजकीय उद्दिष्टांसाठी बँकेच्या निधीचा वापर केला इत्यादी कारणे या संदर्भात चर्चिली जातात. त्यास रिझव्‍‌र्ह बँकेचा दुजोरा अद्याप तरी नाही.

**जातनिहाय जनगणना यशस्वी झाल्यानंतर बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी राज्यातील दारूबंदी धोरणाचा राज्यातील जनतेवर कितपत परिणाम झाला याचा आढावा घेण्यासाठी घरोघरी सर्वेक्षण करण्याचा आदेश अधिकाऱ्यांना दिला आहे. यानुसार सरकारी कर्मचारी पुन्हा नागरिकांच्या घरी पोहोचणार आहेत. कोणतीही बंदी घातल्यावर त्याला वेगळे फाटे फुटतात. बिहारमधील दारूबंदीचे तसेच झाले.**

# दारूबंदीचा (तरी) ‘अंमल’ हवा!

देशातील बिहार, गुजरात, मिझोरम आणि नागालॅण्ड या राज्यांमध्ये सध्या दारूबंदी लागू आहे. गुजरातमध्ये गेली अनेक वर्षे दारूबंदीचा अंमल असला तरी या राज्यात चोरटय़ा मार्गाने दारू उपलब्ध असते. आंध्र प्रदेशमध्ये मुख्यमंत्रीपदी असताना तत्कालीन मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी दारूबंदी लागू केली होती, पण चंद्राबाबू नायडू यांनी सासऱ्याच्या विरोधातच बंड करून सत्ता हस्तगत केल्यावर दोनच वर्षांत महसूल बुडतो हे कारण पुढे करीत दारूबंदी उठविण्यात आली. दारूबंदी लागू करण्यात येणाऱ्या भागांमध्ये दारू सहजच उपलब्ध होते हे नेहमी अनुभवास येते. राज्यात वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये दारूबंदी लागू करण्यात आली होती. यापैकी चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदी शेवटी उठविण्यात आली. दारूबंदी लागू असली तरी त्या सहा वर्षांच्या काळात चंद्रपूरमध्ये दारू सहज मिळत असे. फक्त सरकारचा महसूल बुडत होता. शेवटी सत्ताबदल झाल्यावर



महाविकास आघाडी सरकारने दारूबंदी उठवली. ‘गांधी जिल्हा’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्धा जिल्ह्यात गेल्या चार दशकांहून अधिक काळ दारूबंदी लागू आहे. ‘लोकांना चांगली दारू पिता यावी म्हणून बंदी उठवावी’, असे मतप्रदर्शन विधानसभेचे तत्कालीन उपाध्यक्ष दिवंगत प्रमोद शेंडे यांनी भर सभागृहात करून साऱ्यांनाच चकित केले होते. बिहारमध्ये आपले राजकीय गुरू कर्पुरी ठाकूर यांचा आदर्श समोर ठेवून नितीशकुमार यांनी एप्रिल २०१६ मध्ये दारूबंदी लागू केली. १९७०च्या दशकात ठाकूर मुख्यमंत्रीपदी असताना त्यांनी दारूबंदी लागू केली खरी, पण अल्पावधीत सरकार कोसळले आणि दारूबंदी उठविण्यात आली. बिहारसारख्या मागास राज्यात रोजगाराच्या संधी कमी, शेतीवर सारा उदरनिर्वाह यामुळेच दारूच्या आहारी जाण्याचे प्रमाणही जास्त. यामुळेच नितीशकुमार यांच्या दारूबंदीच्या धोरणाचे स्वागत झाले होते. विशेषत: महिला वर्गात नितीशकुमार यांची प्रतिमा उंचावली होती. गुजरातमध्ये जे होते तोच प्रकार बिहारमध्ये झाला. विषारी दारू प्राशन केल्याने लोक जीव गमविण्याचे प्रकार वाढले. बिहारमध्ये दारूबंदी लागू झाल्यापासून गेल्या सात वर्षांत विषारी दारू प्राशन केल्याने ३००च्या आसपास जणांनी जीव गमावले आहेत. मृतांच्या आकडय़ांवरून बिहार सरकार आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगात मतभेदही दिसून आले. गेल्या डिसेंबरमध्ये सरन जिल्ह्यात विषारी दारूमुळे ४२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती बिहार सरकारने दिली, पण मानवाधिकार आयोगाने मृतांचा आकडा ७२ असल्याचे जाहीर केले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मी माझा शब्द मागे घेतो : जरांगे

## भुजबळ हे सवैंधानिक पदावर असूनही काहीही बरळत आहेत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा वाद चांगलाच रंगताना दिसत आहे. मनोज जरांगेंनी त्यांच्या एका भाषणावेळी 'लायकी' शब्द वापरला आणि ओबीसी नेत्यांनी त्यावरुन जरांगेंना चांगलच टार्गेट केलं होतं. मात्र आता मनोज जरांगेंनी लायकी शब्द मागे घेत असल्याचं स्पष्ट सांगितलं. यावेळी भुजबळांसाठी नाही तर प्रकाश आंबेडकरांच्या सल्ल्याने हा शब्द मागे घेतो असं मनोज जरांगेंनी सांगितलं.**

मनोज जरांगे यांनी त्यांच्या एका भाषणात बोलताना 'ज्यांची लायकी नाही त्यांच्या हाताखाली काम करावं लागतंय' असं वक्तव्य केलं होतं. त्यानंतर वंचितचे प्रकाश आंबेडकरांनी त्यावर प्रतिक्रिया दिली होती. त्यानंतर आता मनोज जरांगे यांनी आपण लायकी हा शब्द मागे घेत असल्याचं जाहीर केलं. तसेच मराठ्यांना न्याय मिळावा हाच हेतू असल्याचं मनोज जरांगे यांनी सांगितलं.





लायकी हा शब्द मागे घेताना तो छगन भुजबळांमुळे नाही तर प्रकाश आंबेडकरांमुळे मागे घेत असल्याचं मनोज जरांगे म्हणाले. ते म्हणाले की, प्रकाश आंबेडकरांचा सल्ला आपण ऐकला आहे. प्रकाश आंबेडकर हे एका उंचीचे नेते आहेत. त्यांनी जे बोललं ते पटलं आहे. पण प्रकाश आंबेडकरांमुळे हा शब्द मागे घेतो, त्या भुजबळांमुळे नाही. भुजबळ हे सवैंधानिक पदावर असले तरीही काहीही बरळतात. त्यांना काय म्हणायचं ते म्हणू दे. ते म्हणाले होते की, जरांगेंनी कोणत्या अँगलने तो शब्द वापरला ते माहिती नाही. पण त्यांनी मराठा समाजाच्या नेत्यांबद्दलच तो शब्द वापरला असावा. कारण मराठा समाजाचे एवढे नेते मुख्यमंत्री झाले, मंत्री झाले, पण त्यांनी समाजासाठी काहीही केलं नाही. दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यासह विविध मागण्यासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांची येथे ३ डिसेंबरला धुळ्यात जाहीर सभा होणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या सभेच्या पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघाकडून तयारीला वेग आला आहे. तर 8 डिसेंबरला मनोज जरांगे पाटलांची नांदेड जिल्ह्यात चार ठिकाणी सभा होणार आहे. आरक्षण ७० वर्षांपूर्वी मिळाले असते, तर सनदी अधिकारी बनणाऱ्या मराठा मुलांना खालच्या पदावर समाधान मानावे लागले नसते. नोकरीतील टक्का कमी झाला, परिणामी हुशार असतानाही लायकी नसणाऱ्यांच्या हाताखाली काम करण्याची वेळ आली," असं धक्कादायक विधान मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यावरून राज्यभरात गदारोळ निर्माण झाला. छगन भुजबळ यांनीही मनोज जरांगेंचा खरपूस समाचार घेतला होता. मनोज जरांगे पाटलांनी आता यावरून आपले शब्द मागे घेत असल्याचं म्हटले आहे. टीव्ही ९ मराठीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. "माझ्या बोलण्याचा उद्देश तो नव्हता. माझा उद्देश वेगळा होता. त्याला जाणीवपूर्वक जातीय रंग दिला गेला. त्या शब्दाचा गैरसमज झाला. काही लोकांनी त्या शब्दाचा वेगळा अर्थ जोडून राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केला. माझ्या बोलण्याचा उद्देश तो नव्हता. कारण मी कधीही जीवनात जातीयवाद केला नाही. माझ्या गोदापट्ट्यातील लोकांनाही माहितेय की मी कधीही जातीवाद केला नाही. मराठा आरक्षणावरून आमचं ध्येय, मन हटणार नाही. आम्ही आमच्या ध्येयावरून विचलीत होणार नाही. परंतु, काही लोकांचा गैरसमज होऊ नये म्हणून मी तो शब्द मागे घेतो", असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

### मनोज जरांगे काय म्हणाले होते?

मराठा समाजातील मुलांना ९५ टक्के पडूनही नोकरी लागत नाही. आमची मुले हुशार असतानाही, आरक्षणात बसत असूनही आरक्षण नसल्याने लाखो मुले सुशिक्षित बेरोजगार राहिले. हेच आरक्षण ७० वर्षांपूर्वी मिळाले असते, तर सनदी अधिकारी बनणाऱ्या मराठा मुलांना खालच्या पदावर समाधान मानावे लागले नसते. नोकरीतील टक्का कमी झाला, परिणामी हुशार असतानाही लायकी नसणाऱ्यांच्या हाताखाली काम करण्याची वेळ आली," असं जरांगे-पाटलांनी म्हटलं होतं. जरांगे-पाटलांचं मत योग्य आहे. माझी लायकी काय? मी तर माळी आहे. माझ्या हाताखाली काम करणारा मराठा माझ्यापेक्षा जातीनं मोठा आहे. दलित पोलीस अधीक्षक होतो. त्याच्या हाताखाली उपअधीक्षक मराठा असतो. अधीक्षकांनी काम करूच नये. कारण, त्यांची लायकी नाही. हे नवीन चातुर्वर्ण तयार झालं आहे.

# संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार?

## आयात शुल्काचा भार सरकार उचलण्याच्या विचारात : फडणवीस

। हिंगोली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेशाने भारतीय संत्र्यांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लावल्याने विदर्भातून होणारी निर्यात मंदावली आहे. त्यामुळे बांगलादेशात शेतकऱ्यांना भराव्या लागणाऱ्या आयात शुल्काचा काही भार हा राज्य सरकार उचलण्याच्या विचारात असल्याचं उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं. तसेच राज्य सरकार त्या संदर्भात लवकरच निर्णय घेणार असल्याची माहिती देखील यावेळी देवेंद्र फडणवीसांनी दिलीये. त्यानुसार संत्र्यावरील आयात शुल्काच्या 50% राज्य सरकार प्रतिपूर्ती स्वरूपात देणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना देखील मोठी मदत मिळेल, असं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं.**



नागपुरात मागील चार दिवसांपासून ऍग्रो व्हिजन या कृषी प्रदर्शनाचा सोमवार 27 नोव्हेंबर रोजी समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. याच कार्यक्रमादरम्यान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ही माहिती दिलीये.

काही दिवसांपूर्वी यासंदर्भात भाष्य केलं होतं. बांगलादेशने लावलेल्या प्रचंड आयात शुल्कामुळे विदर्भातून बांगलादेशला होणारी संत्र्याची निर्यात मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याचं वास्तव एबीपी माझाने मांडलं होतं. त्यामुळे शेतकरी आणि निर्यातदार अडचणीत आल्याचं सांगण्यात येत आहे. गेल्या काही वर्षापासून विदर्भातून बांगलादेशला संत्र्याची निर्यात प्रचंड वाढली आहे. लाखो टन संत्रा बांगलादेशला निर्यात केला जातो. मात्र बांगलादेशने वैदर्भीय संत्र्यावर प्रति किलो 88 रुपये एवढा प्रचंड आयात शुल्क लावल्यामुळे वैदर्भीय शेतकऱ्यांना बांगलादेशामध्ये संत्रा निर्यात करणे कठीण होऊन बसले होते. विदर्भात लाखो टन संत्रा बागांमध्येच पडून असल्याची बातमी एबीपी माझाने काही दिवसांपूर्वी दाखवत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा सर्वांसमोर मांडली होती.

त्यानंतर सरकारला जाग आली असून राज्य सरकार बांगलादेशामध्ये भराव्या लागणाऱ्या आयात शुल्काचा 50% भाग शेतकऱ्यांना प्रतिपूर्ती म्हणून देण्याचा विचारात असल्याचं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं आहे. देशाला लागणारं इंधन हे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये निर्माण झालं पाहिजे. या स्वप्नासाठी नितीन गडकरी गेली दहा ते पंधरा वर्षे काम करत आहेत. आता हळूहळू त्यांचं स्वप्न साकार होण्याकडे वाटचाल करतोय. शेत पिकांवर आधारित जैविक इंधनामुळे देशाचा परकीय चलन साठा देखील वाढवण्यास मदत होईल.

त्याचप्रमाणे प्रदूषण देखील कमी होण्यास मदत होईल. नागपुरात मागील चार दिवसांपासून ऍग्रो व्हिजन या कृषी प्रदर्शनाचा सोमवार 27 नोव्हेंबर रोजी समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. याच कार्यक्रमादरम्यान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ही माहिती दिलीये.

### लाखो टन संत्रा बांगलादेशला

गेल्या काही वर्षापासून विदर्भातून बांगलादेशला संत्र्याची निर्यात प्रचंड वाढली आहे. लाखो टन संत्रा बांगलादेशला निर्यात केला जातो. मात्र बांगलादेशने वैदर्भीय संत्र्यावर प्रति किलो 88 रुपये एवढा प्रचंड आयात शुल्क लावल्यामुळे वैदर्भीय शेतकऱ्यांना बांगलादेशामध्ये संत्रा निर्यात करणे कठीण होऊन बसले होते. त्यानंतर सरकारला जाग आली असून राज्य सरकार बांगलादेशमध्ये भराव्या लागणाऱ्या आयात शुल्काचा 50% भाग शेतकऱ्यांना प्रतिपूर्ती म्हणून देण्याचा विचारात असल्याचं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं आहे.

# राहुलच्या अडचणीत पुन्हा वाढ होणार?

## » काँग्रेस सत्तेचा सोपान गाठणार असल्याची चर्चा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्या अडचणी वाढू शकतात. केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे माजी अध्यक्ष अमित शाह यांच्याविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी करून मानहानीच्या आरोपाखाली सुलतानपूरच्या खासदार/आमदार न्यायालयाने राहुल गांधींना समन्स बजावले आहे. देहात पोलीस स्टेशन परिसरातील हनुमानगंज येथील जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष विजय मिश्रा यांनी 4 ऑगस्ट 2018 रोजी काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि खासदार राहुल गांधी यांच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता.**



8 मे 2018 रोजी राहुल गांधी यांनी बंगळुरू येथे पत्रकार परिषदेत तत्कालीन भाजप अध्यक्ष अमित शहा यांच्यावर अशोभनीय टिप्पणी केली होती. इतकेच नाही तर राहुल गांधींनी अमित शहा यांना खुनाचा आरोपी ठरवून त्यांची बदनामी केली होती. या प्रकरणी विजय मिश्रा यांनी याचिका दाखल करून राहुल गांधींना न्यायालयात बोलावून खटला चालवण्याची मागणी केली होती. याचिकाकर्त्यांचे वकील संतोष पांडे यांनी समन्सवर युक्तिवाद केला. याचिकाकर्ते विजय मिश्रा यांच्यासह साक्षीदार रामचंद्र आणि अनिल मिश्रा यांचीही साक्ष न्यायालयाने महत्त्वाची मानली. सोमवारी विशेष न्यायालयाने राहुल गांधींवरील आरोप प्रथमदर्शनी सत्य म्हणून स्वीकारले आणि त्यांना खटल्यासाठी समन्स बजावण्याचे आदेश दिले. या प्रकरणाच्या सुनावणीची तारीख 16 डिसेंबर निश्चित करण्यात आली असून समन्स बजावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे राहुल गांधींच्या अडचणी वाढू शकतात. पनौती या शब्दावरुन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केली होती. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून त्यांनी नोटीस बजावण्यात आली. 25 नोव्हेंबरपर्यंत म्हणजेच पुढील दोन दिवसांत या नोटीशीला उत्तर द्याचे होते. राजस्थानमधील एका प्रचारसभेत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला होता. दरम्यान राहुल गांधी यांच्या वक्तव्यावरुन राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आलं. तसेच भाजपकडूनही राहुल गांधी यांना प्रत्युत्तर देण्यात येत होतं. 2019 मधील लोकसभा निवडणुकीत कर्नाटकमधील जाहीर सभेत भाषण करताना राहुल गांधी यांनी सगळ्या चोरांचे नाव मोदी का आहे, असा सवाल केला होता. या प्रकरणी सूरतमधील एका कोर्टात दावा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी राहुल गांधी हे दोषी आढळले असून त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली. त्यामुळे त्यांची खासदारकी रद्द करण्यात आली. सूरत कोर्टाच्या या निर्णयाला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले असून सुप्रीम कोर्टाने या शिक्षेला स्थगिती दिली आहे.

### काय आहे संपूर्ण प्रकरण

» 8 मे 2018 रोजी राहुल गांधी यांनी बंगळुरू येथे पत्रकार परिषदेत तत्कालीन भाजप अध्यक्ष अमित शहा यांच्यावर अशोभनीय टिप्पणी केली होती. इतकेच नाही तर राहुल गांधींनी अमित शहा यांना खुनाचा आरोपी ठरवून त्यांची बदनामी केली होती. या प्रकरणी विजय मिश्रा यांनी याचिका दाखल करून राहुल गांधींना न्यायालयात बोलावून खटला चालवण्याची मागणी केली होती. याचिकाकर्त्यांचे वकील संतोष पांडे यांनी समन्सवर युक्तिवाद केला. याचिकाकर्ते विजय मिश्रा यांच्यासह साक्षीदार रामचंद्र आणि अनिल मिश्रा यांचीही साक्ष न्यायालयाने महत्त्वाची मानली. सोमवारी विशेष न्यायालयाने राहुल गांधींवरील आरोप प्रथमदर्शनी सत्य म्हणून स्वीकारले आणि त्यांना खटल्यासाठी समन्स बजावण्याचे आदेश दिले. या प्रकरणाच्या सुनावणीची तारीख 16 डिसेंबर निश्चित करण्यात आली असून समन्स बजावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे राहुल गांधींच्या अडचणी वाढू शकतात.

# मजुरांच्या सुटकेसाठी बचावकार्य पुढे सुरू!

## » बोगद्याच्या 31 मीटपर्यंत खोदकाम पूर्ण

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**४१ मजूर गेल्या १५ दिवसांपासून अडकून पडलेल्या सिलक्यारा बोगद्याच्या वरील भागातून सुरू झालेले खोदकाम सोमवारी ३१ मीटरपर्यंत पूर्ण झाले. याचवेळी, ढिगाऱ्यातून प्रत्यक्ष (मॅन्युअल) आडवे खोदकाम करण्यासाठी अरुंद खोदकाम करणारे एक पथक सोमवारी घटनास्थळी येऊन पोहचले.सध्या उभ्या दिशेने आणि मजुरांद्वारे आडवे खोदकाम या दोन पद्धतींद्वारे बचावाच्या प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. बोगद्याच्या बारकोट दिशेने आडवे खोदकाम करण्यासारख्या इतर पर्यायांवरही काम सुरू आहे.**



सुटकेचा मार्ग तयार करण्यासाठी बोगद्याच्या वरील भागातून एकूण ८६ मीटरपर्यंत खणावे लागणार आहे. बोगद्याच्या वरील भागातून १.२ मीटर व्यासाचे पाइप टाकावे लागणार असून, अडकलेल्या मजुरांपर्यंत पोहचण्याचा दुसरा पर्याय म्हणून याबाबतचे काम रविवारी सुरू झाले.वरील बाजूने ३१ मीटरपर्यंत खोदकाम करण्यात आले असल्याची माहिती लष्कराचे निवृत्त माजी प्रमुख अभियंते ले.ज. हरपाल सिंग यांनी सिलक्यारा येथे वार्ताहरांना दिली. सीमा रस्ते संघटनेचे प्रमुख राहिलेले सिंग हे बचाव मोहिमेत सहभागी झाले आहेत. मातीच्या थराबाबत जाणून घेण्यासाठी आणि मार्गात काही अडथळे आहेत का हे पाहण्यासाठी वरील दिशेने घालण्यात आलेले २०० मिमी व्यासाचे पाइप ७० मीटरपर्यंत पोहचले आहेत. आता मुख्य बोगद्याच्या आत आडव्या दिशेने यंत्रांचा वापर न करता खोदकाम करण्याची तयारी सुरू आहे, असे सिंग यांनी सांगितले. ही धिम्या गतीने चालणारी आणि कठीण प्रक्रिया असून, तीत हे लोक ढिगाऱ्यातून टाकलेल्या ८०० मिलीमीटर व्यासाच्या पाइपमधून एकामागे एक आत शिरतील व आणखी पाइप टाकण्यासाठी फावडय़ांच्या सहायाने ढिगारे हटवतील. मानसोपचारतज्ज्ञांद्वारे समुपदेशन, दररोज नातेवाईकांशी बोलणे इ. मार्गांनी उत्तराखंडमधील कोसळलेल्या सिलक्यारा बोगद्यात अडकलेल्या मजुरांचे मनोबल कायम राखण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. कोसळलेल्या भागात साठलेल्या ढिगाऱ्यापलीकडे दोन किलोमीटरच्या निर्मित क्षेत्रात अडकलेल्या मजुरांपर्यंत एका पाइपमधून एक माईक पाठवण्यात आला असून, त्याच्या सहायाने त्यांना बाहेरच्या लोकांशी बोलता येते. ‘घाबरू नकोस. आम्ही प्रयत्न करत आहोत’, असे आत अडकलेल्या सबा अहमद या मजुराचे नातेवाईक ज्यावेळी त्याच्याशी संपर्क साधतात, त्यावेळी सांगत असतात. खोदकामातील अडथळ्यांमुळे बचाव मोहीम लाबणीवर पडली, त्यावेळी त्याला प्रोत्साहन देण्यासाठी डॉक्टर व मानसोपचारतज्ज्ञांनी त्याचे समुपदेशन केले, असे त्याचा भाऊ नैयर अहमद याने सांगितले.

# गुजरातमध्ये अवकाळी पावसाचा कहर!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

देशातील अनेक राज्यांमध्ये अवकाळी पाऊस सुरू आहे. मुंबईसह महाराष्ट्रातही कालपासून अधून मधून रिमझिम पाऊस पडतोय. दुसऱ्या बाजूला गुजरात राज्याला अवकाळी पावसाचा तडाखा बसला आहे. रविवारी सकाळपासून चालू असलेल्या या पावसामुळे अनेक शहरं आणि जिल्ह्यांमधील जनजीवन विस्कळीत झालं आहे. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यात आतापर्यंत वीज पडून २० जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांची संख्या याहून अधिक असू शकते असं म्हटलं जात आहे. या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानीदेखील झाली आहे. तसेच ४० हून अधिक पाळीव जनावरं (गायी-म्हशी) दगावली आहेत. गुजरातच्या अमरेली, सुरेंद्रनगर, मेहसाना, बोताड, पंचमहाल, खेडा, साबरकांठा, सुरत आणि अहमदाबाद या जिल्ह्यांना पावसाचा तडाखा बसला आहे. या जिल्ह्यांमध्ये पावसासह ताशी ५ किमी वेगाने वारा वाहत असल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे. गुजरातमधील काही भागात गारपिटीचे दृश्यही पाहायला मिळत आहे. हिवाळ्यातही पावसाळ्यासारखे वातावरण निर्माण झाले आहे. सौराष्ट्रातील जुनागढ, कच्छ, गीर-सोमनाथ, उना, गोंडल, जेतपूरसह अनेक भाग प्रभावित झाले आहेत. मोरबीमध्ये गारांसह पाऊस झाला. अवकाळी पाऊस झाल्यास पिकांवर रोग पडून मोठं नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या बहुसंख्य शेतकऱ्यांनी गहू, ज्वारी, मूग या पिकांची लागवड केली आहे. त्यानंतर पावसाला सुरुवात झाल्याने शेतकरीही संभ्रमात पडले आहेत. वादळी वाऱ्यामुळे चिकू, ज्वारी, कापूस या पिकांचे नुकसान होण्याची भीती आहे.

# कॉफी विथ करणमध्ये 'कुछ कुछ होता है'!

बॉलिवूडमधील प्रसिद्ध दिग्दर्शक आणि चित्रपट निर्माता करण जोहरचा (KARAN JOHAR) कॉफी विथ करण-8 (KOFFEE WITH KARAN 8) हा शो गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. या कार्यक्रमाचा सध्या आठवा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आता कॉफी विथ करण-8 या कार्यक्रमाच्या आगामी एपिसोडमध्ये अभिनेत्री राणी मुखर्जी आणि काजोल हे उपस्थिती लावणार आहेत. नुकताच कॉफी विथ करण या कार्यक्रमाचा एक प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रोमोमध्ये राणी आणि काजोल या करणच्या विविध प्रश्नांना मजेशीर उत्तरं देताना दिसत आहेत. कॉफी विथ करण-8 या कार्यक्रमाच्या प्रोमोमध्ये दिसत आहे की, करण हा राणी आणि काजोलचं शोमध्ये स्वागत करतो, तो म्हणतो, "माझ्या पहिल्या लिडिंग लेडिजचं मी स्वागत करतो." त्यानंतर राणी करणला म्हणते, "मला तुला एक्सपोज करायचंय." त्यानंतर काजोल म्हणते, मला आतापासूनच हा शो आवडायला लागला आहे." पुढे राणी करणला म्हणते, "तू माझ्या हातून अन्न हिसकावून घेतलंस, मला मारलंस." तेव्हा करण म्हणतो, "मी तुला मारलं नाही," प्रोमोमध्ये पुढे दिसते की, राणी आणि काजोल या करणनं विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं बझर वाजवून देत आहेत. 1998 मध्ये राणी, काजोल आणि शाहरुख यांचा कुछ कुछ होता है हा चित्रपट रिलीज झाला होता. या चित्रपटाला रिलीज होऊन 25 वर्षे झाली आहेत. या चित्रपटाचं दिग्दर्शन करण जोहरनं केलं होतं. तसेच या चित्रपटात सलमान खान, अर्चना पूरण सिंग, अनुपम खेर आणि जॉनी लीव्हर यांनी देखील काम केलं होतं. कॉफी विथ करण या कार्यक्रमाच्या 8 व्या सीझनमध्ये आतापर्यंत दीपिका पादुकोण,रणवीर सिंह, बॉबी देओल, सनी देओल, आलिया भट्ट, करीना कपूर,वरुण धवन,सिद्धार्थ मल्होत्रा या सेलिब्रिटींनी हजेरी लावली आहे. आता कॉफी विथ करण या कार्यक्रमाच्या आगामी एपिसोडमध्ये राणी आणि काजोल या कोणकोणते किस्से सांगणार?

## 'अक्षरा'ची राजकारणात एंट्री?

आपल्या गोड आवाजासाठी आणि बहारदार अभिनयासाठी ओळखल्या जाणाऱ्या अक्षराचा चाहतावर्ग मोठा आहे. ती सोशल मीडियावर देखील मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय असणारी सेलिब्रेटी आहे. आता अक्षराच्याबाबत एका बातमीनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अभिनेत्री अक्षरा सिंग ही आता राजकारणात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. राजकारणातील मास्टर माईंड म्हणून ज्यांची ओळख आहे त्या प्रशांत किशोर हे तिला याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या भेटीनंतर अक्षरा सिंगनं मोठा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. अक्षराच्यापूर्वी भोजपूर्वी पवन सिंगनं देखील राजकारणात प्रवेश घेतला होता. अक्षरा ही आता मनोरंजन क्षेत्राबरोबर राजकारणात आपलं नशीब अजमावणार आहे. आजतकशी बोलताना अक्षरानं सांगितलं होतं की, प्रशांत किशोर यांचे मार्गदर्शन घेऊन ती त्यांच्या जन स्वराज्य पार्टीची सदस्य होणार आहे. या बातमीनंतर भोजपूरी मनोरंजन विश्वात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. भोजपूरी मनोरंजन क्षेत्रातील मनोज तिवारी अन् रवि किशन हे सेलिब्रेटी राजकारणात सध्या मोठ्या प्रमाणावर सक्रिय आहेत.

## आलिया ठरली डीपफेकची शिकार!



सध्या सोशल मिडिया हाताळणं खुपच धोक्याचं काम झालं आहे. कारण रोजच सोशल मिडियावर अनेक डिपफेक व्हिडिओ व्हायरल होत आहे. सर्व समान्य लोकांपासून अनेक कलाकारांपर्यंत बरेच लोक या डिपफेक व्हिडिओचे शिकार झाले आहेत. डिप फेक व्हिडिओची चर्चा तेव्हा जास्त सुरु झाली जेव्हा अभिनेत्री रश्मिका मंदानाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला. मात्र हा व्हिडिओ तिचा नव्हता तर दुसऱ्याच मुलीचा होता. त्यानंतर बऱ्याच कलाकारांचे डिपफेक व्हिडिओ समोर आले. कतरिना कैफ आणि काजोल, सारा यांचे व्हिडिओही व्हायरल झाले. त्यातच आता आलिया भट्टचा एक व्हिडिओ देखील सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. सोशल मिडियावर आलिया भट्टचा डीपफेक व्हिडिओ व्हायरल झाल्याने चाहत्यांना धक्का बसला आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये एका मुलीने निळ्या रंगाचा फुलांचा को-ऑर्डर सेट परिधान केला आहे. ती मुलगी कॅमेऱ्याकडे अश्लील हावभाव करत आहे. या मुलीच्या चेहऱ्यावर आलियाचा चेहरा एडिट केला आहे. मात्र हा व्हिडिओ पाहिल्यानंतर लगेच कळेत की हा व्हिडिओ दुसऱ्या मुलीचा आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करुन आलियाचा अश्लील व्हिडिओ बनवला आहे. इतकंच नाही तर तो सोशल मीडियावर व्हायरल केला जातो. रश्मिकाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर केंद्राने याची दखल घेतली होती आणि नियमावली जारी केली होती. यावर रश्मिकाने देखील पोस्ट शेयर करत हे खुपच धोकादायक असल्याचं म्हटलं होतं. तर सारा तेंडूलकरने देखील तिच्या डिपफेक फोटोबाबत पोस्ट शेयर केली होती.

## दिवाळीच्या निमित्तानं परिणीतीला 'गिफ्ट'



बॉलीवूड अभिनेत्री परिणीती चोप्रा ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या फोटो आणि पोस्टमुळे चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. परिणीती आणि राघव चढ्ढाचं वेडिंग हा चाहत्यांच्या कुतूहलाचा विषय होता. त्या लग्नाला बॉलीवूड, राजकारण, समाजकारण, उद्योगविश्व क्षेत्रातील अनेक सेलिब्रेटी उपस्थित होते. आता परिणीती ही तिच्या एका पोस्टमुळे चर्चेत आली आहे. ज्यात तिनं तिला दिवाळीच्या निमित्तानं सासरच्या लोकांकडून जे गिफ्ट मिळालं आहे ते तिनं चाहत्यांनाही शेयर केलं आहे. ते खास गिफ्ट पाहून चाहत्यांनीही परिणीतीला प्रतिसाद दिला आहे. परिणीतीनं काही दिवसांपूर्वी तिच्या सासरच्या आणि माहेरच्या लोकांसोबतच्या ट्रीपचे फोटोही शेयर केले होते. परिणीती ही सध्या तिच्या सासरी दिल्लीमध्ये आहे. यावेळी परिणीतीनं इंस्टावरुन काही फोटो शेयर केले आहेत. ज्याची मोठ्या प्रमाणावर चर्चा आहे. त्यावरुन तिला आलेल्या प्रतिक्रियाही भन्नाट आहे. तो फोटो एका पाचक गोळ्यांचा आहे. परिणीतीला ते गिफ्ट तिच्या नंदेनं दिलं आहे. ती पोस्ट शेयर करताना परिणीतीनं म्हटलं आहे की, माझ्या नंदेनं हे खास गिफ्ट मला दिलं आहे. मी तब्बल वीस वर्षांनंतर ही कँडी खाल्ली असून पुन्हा जुन्या आठवणी ताज्या झाल्या आहेत. परिणीतीची ती पोस्ट व्हायरल झाल्यानंतर नेटकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रियाही भन्नाट आहे. काहींनी म्हटलं आहे की, हे असं गिफ्ट देण्यामागे सासरच्या मंडळींनी काय विचार केला असेल, काहींनी म्हटलं आहे की, खूपच युनिक प्रकारचे गिफ्ट परिणीती तुला मिळाले आहे. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे. परिणीतीच्या वर्कफ्रंटविषयी बोलायचं झाल्यास तिचा काही दिवसांपूर्वी अक्षय कुमारसोबत मिशन रानीगंज नावाचा चित्रपट आला होता. त्याला प्रेक्षकांचा जेमतेम प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले होते. तिनं बिग बी अमिताभ बच्चन यांच्यासोबत उचाई नावाच्या चित्रपटामध्ये चमकली होती. त्यालाही प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही. बिग बी अमिताभ बच्चन, बोमन इराणी, अनुपम खेर यांच्या महत्वाच्या भूमिका होत्या आता परिणीती प्रसिद्ध दिग्दर्शक इम्तियाज अली यांच्या चमकीला मध्ये दिसणार आहे.

## बॉक्स ऑफिसवर 'झिम्मा २' चा धिंगाणा!

मराठी मनोरंजन विश्वात प्रेक्षकांची तुफान लोकप्रियता मिळवलेल्या झिम्मा या चित्रपटाचा दुसरा भाग प्रदर्शित झाला आहे. त्याला रसिकांचा तुफान प्रतिसादही मिळाला आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित झिम्माच्या पहिल्या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई केली होती. त्यानंतर त्याच्या दुसऱ्या चित्रपटानं प्रेक्षकांना जिंकून घेतले आहे. झिम्मा २ ने पहिल्या तीनच दिवसांत दमदार सुरुवात केली आहे. त्यातून त्यांनी केलेली कमाई अवाक् करणारी आहे. पहिल्या भागाला देखील प्रेक्षक आणि चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. मराठीतील अनेक सेलिब्रेटींनी झिम्मा २ चे कौतुक केले असून त्यांनी प्रेक्षकांनी आवर्जून हा चित्रपट पाहावा असे आवाहन प्रेक्षकांना केले आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित 'झिम्मा २' सध्या चित्रपटगृहात प्रेक्षकांची गर्दी खेचताना दिसतो आहे. २४ नोव्हेंबरला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने अवघ्या तीन दिवसांत बॉक्स ऑफिसवर कमाल कमाई केली आहे. 'झिम्मा २' ने ४.७७ कोटींचा गल्ला जमवला असून या आकड्याचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे. चित्रपटाला मिळणाऱ्या यशाबद्दल दिग्दर्शक हेमंत ढोमेनं म्हटलं आहे की, "प्रेक्षकांकडून मिळणारे प्रेम सुखावणारे आहे. आम्ही अनेक थिएटर्सना भेट देत आहोत खूप ठिकाणी हाऊसफुल्लचे बोर्ड झळकत आहेत. चित्रपट पाहून प्रेक्षकांच्या मिळणाऱ्या प्रतिक्रिया भारावणाऱ्या आहेत.

# हार्दिक पांड्या मुंबईच्या ताफ्यात!

## हार्दिकच्या नेतृत्वात गुजरातची धमाकेदार कामगिरी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारताच्या ट्रेन्टी ट्रेन्टी संघाचा कर्णधार हार्दिक पंड्याला आपल्या संघात घेण्यास मुंबई इंडियन्सला यश आलंय. हार्दिकने गुजरात टायन्सला पदार्पणाच्या हंगामातच आयपीएलचं विजेतेपद मिळवून दिलं होतं. तर गेल्या हंगामात गुजरात टायटन्सने अंतिम सामन्यात धडक मारली होती. आता हार्दिक पंड्या मुंबईच्या संघात परताच गुजरात टायटन्सचा नवा कर्णधार मिळालाय. गुजरातने धडाकेबाज फलंदाज शुभमन गिलवर नेतृत्वाची जबाबदारी सोपवली आहे. हार्दिक पांड्या 2015 पासून मुंबईच्या ताफ्यात होता. त्यानंतर 2022 मध्ये तो गुजरात संघाचा कर्णधार झाला. त्यानंतर आता पुन्हा तो मुंबईच्या ताफ्यात सामील झालाय.**

हार्दिक पांड्याने गुजरात टायटन्सचं कर्णधारपद सोडून मुंबईची वाट का धरली? याची जोरदार चर्चा सुरु आहे. याचे उत्तर गुजरात टायटन्सच्या डायरेक्टर ऑफ क्रिकेट विक्रम सोळंकी यांनी दिलेय. ते म्हणाले की," हार्दिक पांड्याने मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात जाण्याची इच्छा व्यक्त केली होती, त्याच्या निर्णायचा आम्ही सन्मान केला. हार्दिक पांड्या मुंबईच्या संघाचा पुन्हा एकदा सदस्य झालाय. हार्दिकच्या नेतृत्वात गुजरातने शानदार कामगिरी केली होती. आयपीएल 2022 मध्ये गुजरातचा संघ पहिल्यांदाच उतरला होता. पहिल्याच हंगामात हार्दिकच्या नेतृत्वात गुजरात संघाने जेतेपद उंचावले होते. त्यानंतर 2023 च्या हंगमात गुजरातला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. फायनल सामन्याच चेन्नईकडून गुजरातला



पराभवाचा सामना करावा लागला होता. अखेरच्या चेंडूवर चेन्नईने थरारक विजय मिळवला होता. IPL मधली सर्वात मोठी घडामोड म्हणून ज्याकडे पाहिलं जात होतं, त्या करारावर अखेर रविवारी रात्री शिक्कामोर्तब झालं. यानुसार गुजरात टायटन्सला आयपीएलचं जेतेपद मिळवून देणारा कर्णधार हार्दिक पंड्या आता स्वगृही अर्थात मुंबई संघात डेरेदाखल होणार आहे.\

रविवारी संध्याकाळी यासंदर्भात काहीसा संभ्रम निर्माण झाला होता. आधी हार्दिकला गुजरातनं आपल्याकडेच ठेवल्याचं वृत्त प्रसारित झालं होतं. मात्र, आता हार्दिक मुंबईकडे परतणार असल्याच्या व्यवहारावर शिक्कामोर्तब झालं आहे.19 डिसेंबरला दुबई येथे खेळाडू लिलावप्रक्रिया पार पडणार असून त्यापूर्वी 12 डिसेंबरपर्यंत संघांना खेळाडूंची अदलाबदल करण्याची मुभा आहे. आता हार्दिक मुंबई संघात परतण्यासाठीची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे. हार्दिक पांड्याचे आयपीएलमध्ये

### त्याच्या निर्णयाचा आदर

» गुजरात टायटन्सचे क्रिकेट संचालक विक्रम सोलंकी म्हणाले, "गुजरात टायटन्सचा पहिला कर्णधार म्हणून हार्दिक पांड्याने फ्रँचायझीला दोन हंगामात चमकदार कामगिरी करण्यास मदत केली आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघ एकदा चॅम्पियन बनला, तर एकदा उप-विजेता ठरला. आता त्याने त्याचा जुना संघ मुंबई इंडियन्समध्ये परतण्याची इच्छा व्यक्त केली आहे. आम्ही त्याच्या निर्णयाचा आदर करतो आणि त्याच्या भविष्यासाठी त्याला शुभेच्छा देतो."

शानदार करियर राहिलेय. हार्दिक पांड्याने आतापर्यंत 123 सामने खेळले आहेत. मुंबई आणि गुजरात संघासाठी हार्दिक पांड्या आयपीएलच्या मैदानात उतरला. हार्दिक पांड्याने आयपीएलमध्ये 145.86 च्या स्ट्राईक रेटने आणि 30.38 च्या स्ट्राईक रेटने 23.09 धावा काढल्या आहेत. गोलंदाजीतही 53 विकेट घेतल्या आहेत. पहिल्याच हंगामात हार्दिकच्या नेतृत्वात गुजरात संघाने जेतेपद उंचावले होते. त्यानंतर 2023 च्या हंगमात गुजरातला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. फायनल सामन्याच चेन्नईकडून गुजरातला पराभवाचा सामना करावा लागला होता. अखेरच्या चेंडूवर चेन्नईने थरारक विजय मिळवला होता. IPL मधली सर्वात मोठी घडामोड म्हणून ज्याकडे पाहिलं जात होतं, त्या करारावर अखेर रविवारी रात्री शिक्कामोर्तब झालं. यानुसार गुजरात टायटन्सला आयपीएलचं जेतेपद मिळवून देणारा कर्णधार हार्दिक पंड्या आता स्वगृही अर्थात मुंबई संघात डेरेदाखल होणार आहे.

# पाकिस्तानी क्रिकेटरला आयपीएल खेळण्याची इच्छा!

## पाकिस्तानसोबतच्या चर्चेपासून व्यापारापर्यंत सर्व काही संपले

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेट जगतामधील सर्वाधिक धनाढ्य स्पर्धा असलेली इंडियन प्रिमियर लीग अर्थात आयपीएल स्पर्धा खेळण्याची प्रत्येक क्रिकेटपटूची इच्छा असते. या स्पर्धेनं अनेकांनी आपल्या प्रतिभेची छाप पाडली असून त्यामुळे राष्ट्रीय संघाची संधी सुद्धा चालून आली. त्यामुळे या स्पर्धेत खेळण्याचा मोह पाकिस्तान क्रिकेटपटूंना का होणार नाही? हे साहजिक आहे. आता याबाबत थेट बोलण्याचं धाडस वेगवान गोलंदाज हसन अलीनं केलं आहे.**



पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज हसन अली आयपीएलमध्ये खेळण्याची मनोकामना आहे. त्याने स्वतः एका मुलाखतीत हे मान्य केले. हसन अलीने एक दिवस आयपीएल खेळण्याची इच्छा असल्याचे म्हटले आहे. 'समा लाउंज'वर बोलताना हसन अली म्हणाला की, 'प्रत्येक खेळाडूला आयपीएल खेळायचे आहे आणि मलाही त्या लीगमध्ये खेळायचे आहे. ती जगातील सर्वात मोठ्या लीगपैकी एक आहे. भविष्यात मला संधी मिळाली, तर मी तिथे नक्कीच खेळेन. आयपीएलच्या पहिल्या सत्रात पाकिस्तानचे अनेक खेळाडू सहभागी झाले होते. या यादीत शोएब मलिक, शोएब अख्तर, कामरान अकमल, सोहेल तन्वीर आणि शाहिद आफ्रिदीसारख्या मोठ्या नावांचा समावेश आहे. 2008 च्या या मोसमात पाकिस्तानी खेळाडूंनी खूप धमाल केली होती. सोहेल तन्वीरने सर्वाधिक विकेट्स घेतल्या. तो पर्पल कॅपचा विजेता होता. मात्र, या हंगामानंतरच पाकिस्तानी खेळाडूंना आयपीएल खेळण्यास बंदी घालण्यात आली होती. नोव्हेंबर 2008 मध्ये मुंबई हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग उघड झाल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबतचे सर्व संबंध संपवले. पाकिस्तानसोबतच्या

### ऑस्ट्रेलियाचा दोन विकेटने पराभव

» नोव्हेंबर 2008 मध्ये मुंबई हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग उघड झाल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबतचे सर्व संबंध संपवले. पाकिस्तानसोबतच्या चर्चेपासून व्यापारापर्यंत सर्व काही जवळपास संपले होते. आयपीएलमध्येही पाकिस्तानी खेळाडूंचा विरोध होता, त्यानंतर आयपीएल समितीला पाकिस्तानी क्रिकेटपटूंना आयपीएल खेळण्यावर बंदी घालावी लागली होती. तेव्हापासून आतापर्यंत पाकिस्तानी खेळाडूंनी आयपीएलमध्ये भाग घेतलेला नाही. 2008 च्या या मोसमात पाकिस्तानी खेळाडूंनी खूप धमाल केली होती. सोहेल तन्वीरने सर्वाधिक विकेट्स घेतल्या. तो पर्पल कॅपचा विजेता होता. मात्र, या हंगामानंतरच पाकिस्तानी खेळाडूंना आयपीएल खेळण्यास बंदी घालण्यात आली होती.

चर्चेपासून व्यापारापर्यंत सर्व काही जवळपास संपले होते. आयपीएलमध्येही पाकिस्तानी खेळाडूंचा विरोध होता, त्यानंतर आयपीएल समितीला पाकिस्तानी क्रिकेटपटूंना आयपीएल खेळण्यावर बंदी घालावी लागली होती. तेव्हापासून आतापर्यंत पाकिस्तानी खेळाडूंनी आयपीएलमध्ये भाग घेतलेला नाही. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर पाकिस्तानला जाणाऱ्या कसोटी संघात हसन अलीचा समावेश करण्यात आला आहे. 30 नोव्हेंबरला तो ऑस्ट्रेलियाला रवाना होणार आहे. सध्या तो पाकिस्तान संघाच्या सराव शिबिरात आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेच्या तयारीच्या उद्देशाने हे शिबिर सुरू करण्यात आले आहे.